# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०५.०६.२०२६ शुक्रवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडीचा गुन्हा त्वरीत उघडकीस.**

दिनांक ०४.०६.२०२६ चे ०९.०० वा. ते दिनांक ०५.०६.२०२६ चे ०१.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, प्लॉट नं. ४५, स्मृती नगर, बोखारा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी मोईन जलील खान, वय ३४ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, परीवारासह नातेवाईकाचे लग्नाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ३,००,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,९०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादीचे वस्तीत राहणारे लोकांनी काही मुलांना हटकले असता, त्यातील एकाने चाकुचा धाक दाखवुन पळुन गेले. पोलीसांनी मिळालेल्या माहीतीवरून, आरोपी अभिजीत सत्येंजय वंजारी, वय २२ वर्षे, रा. दहेगांव भालेराव, जि. नागपुर व त्याचा ०१ साथीदार विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेतले. आरोपीस विचारपुस केली असता, त्याने त्याचा ईतर ०१ साथीदार आरोपी नामे आशुतोष शंकरराव रवारे, वय २० वर्षे, रा. अमर नगर, एमआयडीसी, नागपुर व ईतर ०१ विधीसंघर्षीत बालक असे एकुण चौघांनी मिळुन संगणमताने घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. क्रांती पवार ८६८६००९७५६६६ यांनी आरोपी व विधीसंघर्षीत बालकांविरूध्द कलम ३०५, ३३१(३), ३३१(२), ३(५) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, एका आरोपीस अटक व विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेतले. गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांनी परीसरात शोध घेवुन, ईतर एका विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेतले. एका पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी अरविंद तुलाराम हारगुडे, वय ३३ वर्षे, रा. विराज पार्क, सप्तगंगा सोसायटी, खापरी पुनर्वसन, बेलतरोडी, नागपूर हे महाराष्ट्र मेट्रो रेल, नागपुर येथे टेक्नीशियन—१ पदावर कार्यरत आहेत. दिनांक ०३.०६.२०२६ रोजी रात्रपाळी ड्युटी असल्याने २२.४५ वा. चे सुमारास, ते त्यांचे ड्युटीवर मारूती सुझुकी सेलेरीयो कार क्र. एम.एच. ३२ वाय २०३२ ने जात असता, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, वर्धा रोड कडुन नागपुर कडे येणाऱ्या महेश ढाबा कटींग येथुन यु—टर्न घेत असता, त्यांचे मागुन येणाऱ्या ट्रॅव्हल्स चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन तसेच हॉर्न न वाजवता व इंडीकेटर न देता फिर्यादीचे कारचे उजवे बाजुला धडक देवुन गंभीर अपघात करून कारला फरफटत नेले, बस चालक खुराना ट्रॅव्हल्स बस क्र. एम.एच. ४० सि.टी. ८०३९ तेथेच सोडुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादी हे कारमध्ये अडकल्याने लोकांनी गंभीर जखमी अवस्थेत बाहेर काढुन त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे

दाखल केले, नातेवाईकांनी तेथुन क्रिम्स किंग्ज वे हॉस्पीटल येथे दाखल केलेले आहे. जखमी फिर्यादीचा उपचार सुरू आहे.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या बयानवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. ऋषीकेश कडुस यांनी आरोपी ट्रॅव्हल्स चालकाविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** श्रीमती वेणुबाई आनंदराव गात, वय ७५ वर्षे, रा. व्यंकटेश नगर, नंदनवन, नागपूर ह्या दिनांक ०१.०६.२०२६ चे ०१.३० वा. पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन, राहते घरून मंदीरात जाते असे सांगुन कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे पांढरे लांब, अंगात— पांढऱ्या रंगाचे लुगडे व हिरव्या रंगाचा ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे ईमामवाडा</u> :—** श्रीमती सायमा हुसैन शेख, वय २९ वर्षे, रा. बाभुळगांव, जि. यवतमाळ. ह्या दिनांक ०३.०६.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतुन, कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग— निमगोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे वाठोडा</u> :—** मंगेश दिलीप गोंडाणे, वय ३५ वर्षे, रा. पांढुर्णा, वाठोडा, नागपूर हे दिनांक २२.०३.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— ग्रे रंगाची टि—शर्ट व नाईट फुल पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. ओळख— हातावर इंग्रजीत एम एस अक्षर गोंदलेले आहे.

**<u>४) पोलीस ठाणे वाठोडा</u> :—** येमण सुरज पिछोडे, वय २३ वर्षे, रा. लोखंडी कुटी, तरोडी, वाठोडा, नागपूर हा दिनांक २२.०५.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे वाठोडा हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे, अंगात— हिरव्या रंगाचा शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेले आहे. ओळख— अपंग व मुका आहे.


वेणुबाई


सायमा


मंगेश


येमण

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१०२७० /२००५ | कलम ३२६ भा.दं.वि. | सुरज शिवरामसिंग चव्हाण (ठाकुर), वय ३४ वर्षे, रा. सिपिडब्ल्युडी क्वॉर्टर टाईप २, क्वॉर्टर नं. ३१७, गिट्टीखदान, नागपुर. | १२.०६.२०२६ |
| २ | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३३५२/ २००७ | कलम ३७९ भा.दं.वि. | प्रेम महादेवराव नितनवरे, रा. योगेंद्र नगर, प्लॉट नं. १४२, गिट्टीखदान, नागपुर. | १२.०६.२०२६ |
| ३ | मा. अती. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१७३८/ २०११ | कलम २९४, ५०६, ३२४, ३४ भा.दं.वि. | सुरज नरेश कुत्तरमारे, वय १९ वर्षे, रा. जादु महाल मागे, चंद्रमणी नगर, अजनी, नागपुर. | १२.०६.२०२६ |
| ४. | मा. अती. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००८५०/ २००९ | कलम ३८० भा.दं.वि. | रोनाल्ड उर्फ जॉसेफ लॉरेन्स, वय २६ वर्षे, रा. जाटतरोडी नं. ३, रेल्वे लाईन जवळ, ईमामवाडा, नागपुर. | १७.०६.२०२६ |
| ५. | मा. अती. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३१७०/ २०११ | कलम ४, २५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो. का.. | सौरभ चंद्रशेखर हुमणे, वय १८ वर्षे, रा. फ्लॅट नं. १३, श्रेयश अपार्टमेंट, भगवान नगर, बॅंकेजवळ, नागपुर. | १२.०६.२०२६ |
| ६. | मा. अती. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२४४२/ २०१० | कलम ३७९ भा.दं.वि. | बंटी शम्मी रगडे, वय २२ वर्षे, रा. रेल्वे स्टेशन जवळ, फुटपाथवर, सिताबर्डी, नागपुर. | १९.०६.२०२६ |
| ७. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, मोटार वाहन कोर्ट, नागपुर. | ३१९३/ २०२२ | कलम ४, २५ भा.ह.का. | ओमकार पंचमलाल धुर्वे, वय २३ वर्षे, रा. मानेवाडा जुनी वस्ती, बुध्द विहार जवळ, माही पान ठेल्याजवळ, हुडकेश्वर, नागपुर. | १२.०६.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

**दिनांक ०८.०६.२०२६ ते १३.०६.२०२६ पर्यंत खालील दिलेल्या मार्गावर काम सुरू असुन नमुद मार्गावरून वाहतूक वळविण्यात आले आहे ते खालील प्रमाणे आहे.**

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Projects कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत

०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार जातील किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील

**सदर अधिसुचना दिनांक ०४.०६.२०२६ रोजी पासून ते दि. ०३.०७.२०२६ रोजी पर्यत अंमलात राहील.**

२) वाहतूक परिमंडळ पारडी हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमीटेड कडुन प्रजापती नगर ते ट्रांसपोर्ट नगर पर्यत पिल्लर क्र 4P63 ते 4P77 कापसी खुर्द गाव चे गेट ते कापसी पूलीया चौकी दरम्यान मेट्रो व्हाडक्टरचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर निर्माण काम कापसी खुर्द गाव चे गेट ते कापसी पूलीया चौकी पर्यत होणार असल्याने दोन्ही बाजूस नवीन सर्व्हिस रोड तयार करण्यात आले आहे. सदर काम मार्गाचे मध्यभागी रेल्वेचे बांधकाम करण्यात येणार असल्याने वाहतूक हि सर्व्हिस रोडने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**कापसी खुर्द गाव चे गेट ते कापसी पूलीया चौकी पर्यत जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- नागपूरकडून भंडारा व भंडाराकडून नागपूरकडे जाणारी वाहतूक हि नवीन तयार करण्यात आलेले सर्व्हिस रोडने जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक ०६.०६.२०२६ ते दिनांक ३०.०६.२०२६ पावेतो अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे.)**
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर.